# भारतीय राज्यघटना आणि धर्मनिरपेक्षता

**प्रा.डॉ. मनोज जाधव, श्री. संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**
**प्रा. बाबुराव पवार, श्रीमती आकाताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी.**

........................................................................................................

**प्रास्ताविक**

जे राज्य घटनात्मकदृष्टया कोणत्याही विशिष्ठ धर्माशी बांधील नाही, तसेच ते कोणत्याही विशिष्ठ धर्माला प्रोत्साहन देत नाही आणि त्यात हस्तक्षेपही करीत नाहीत. व्यक्तिला आणि समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते, व्यक्तीचा धर्म कोणताही असो, तिच्याशी नागरिक म्हणून व्यवहार करते, ते धर्मनिरपेक्ष राज्य होय. युरोपात व्यक्तीस्वातंत्र्य, बुद्धीप्रामाण्य, प्रवृत्तिपरता व प्रयोगशीलता यांना स्थान मिळाले. त्यामुळे धर्मनिरपेक्ष समाज आणि धर्मनिरपेक्ष राज्य या तत्वांचा उल्लेख भारतीय राज्यघटनेत करण्यात आला. भारताच्या राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते. १) या राज्यघटनेत कोणत्याही विशिष्ठ धर्म राज्याचा धर्म म्हणून मानला जाणार नाही, २) कोणत्याही धर्माला इतरांपेक्षा अधिक महत्त्व दिलेले नाही, ३) सर्व धर्माच्या लोकांना आपल्या धर्माप्रमाणे प्रार्थना करण्याचा घटनेने अधिकार दिलेला आहे.

**धर्म आणि भारत**

धर्माने समाजाला एकत्र धरून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करावे लागते. पण भारत देशात मात्र धर्म संघटनापेक्षा विघटनात्मक शक्ती म्हणूनच कार्य करताना आढळतो. भारतात अनेक धर्म आहेत. धर्मांधतेपोटी येणारी संकुचित सांप्रदायिकता, जुनाट, बुरसटलेली व प्रतिगामी मनोवृत्ती सर्वच धर्माच्या कट्टर उपासकांमध्ये भारतात आढळून येते. भारतात भिन्नधर्मीय व्यक्ती आज परस्परांना ही सहिष्णूता दाखवू शकत नाहीत. ही दुर्देवी वस्तुस्थिती आहे. भारत हे धर्माधिष्ठीत राष्ट्र नाही. येथे अनेक धर्माचे लोक राहतात. या सर्वांच्या नागरिकत्वाचा दर्जा समान आहे. स्वतंत्र भारताने स्वत:साठी धर्मनिरपेक्ष संविधानाची निवड केलेली आहे.

**भारतीय राज्यघटनेची धर्मविषयक भूमिका**

भारतीय राज्यघटनेत धर्मनिरपेक्षेचा जो अर्थ आहे तो पुढील गोष्टीवर आधारलेला आहे. राज्यांचा असा कोणताही अधिकृत धर्म असू नये, तिने धार्मिक आधारांवर नागरिकांमध्ये भेदभाव करू नये. त्या सर्वांना व्यक्तिगत व सामुदायिक धर्माचे स्वातंत्र्य द्यावे. निर्णयप्रक्रियेत कोणत्याही धर्मसंस्थेला लूडबूड करू देवू नये आणि सर्वसाधारणपणे राज्यसत्तेने धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करू नये. समाजहिताखातर धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्यसत्तेला आहे. आणि त्या दृष्टीने तिचा अधिकार धर्मसंस्थेपेक्षा अधिक वरचढ आहे.

**धार्मिक स्वातंत्र्यांचा अधिकार — कलम २५—२८**

अ) कलम २५ —सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व स्वास्थ्य इत्यादींना बाधक नसणाऱ्या बाबतीत सर्व व्यक्तींना आपल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार आवडीच्या धर्माचा उच्चार, आचार व प्रचार करण्याचा हक्क आहे.

ब) कलम २६ —धार्मिक गट अथवा संस्थांनावरील मर्यादा सांभाळून अ) धार्मिक कारणांसाठी धार्मिक संस्था, विश्वस्त मंडळे स्थापन करणे, ब) अशा संस्थांचा कारभार पाहणे, क) स्थावर व जंगम मालमत्ता संपादणे व बाळगणे, ड) अशा मालमत्तेचे कायद्यान्वये प्रशासन पाहणे.

क) कलम २७ —ज्या करांचे उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माच्या प्रसारासाठी व रक्षणासाठी होणार असे कर सक्तीने वसूल केले जाऊ शकत नाहीत.

ड) कलम २८ —संपूर्ण राज्याच्या निधीतून चालविण्यात येणाऱ्या शिक्षणसंस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देता येणार नाही. धार्मिक शिक्षण देण्याच्या हेतूनेच दिलेल्या देणगीमधून वा विश्वस्त निधीतून चालणाऱ्या संस्था असल्यास तेथे धार्मिक शिक्षण देता येते. पण तिथेदेखील धार्मिक शिक्षणाची सक्ती करता येणार नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांची अथवा पालकांची परवानगी घ्यावी लागते.

कलम २५—२८...च्या आधारे भारतीय राज्यघटनेने देशातील नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार देऊन धर्मनिरपेक्षतेचा पाया घट्ट केलेला आहे.

**सरनामा**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये ४२ व्या घटनादुरूस्तीने १९७६ साली धर्मनिरपेक्ष ही संज्ञा समाविष्ठ केलेली आहे. याचा अर्थ असा की, भारतीय राज्यसंस्थेचा असा कोणताही धर्म नसेल, धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली जाणार नाही व धर्म ही बाब केवळ खाजगी जीवनापुरती मर्यादीत असेल. राज्याद्वारे सर्व लोकांना सद्सद्विवेकाचे तसेच स्वत:च्या निवडीनुसार धर्माचा प्रचार, प्रसार व आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल.

'जे राज्य घटनात्मकदृष्टया कोणत्याही धर्माशी बांधील नाही आणि त्यात हस्तक्षेपही करीत नाही. व्यक्तीला आणि समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते व व्यक्तीचा धर्म कोणताही असो तिच्याशी नागरिक म्हणून इतर सर्वांप्रमाणेच व्यवहार करते तेच धर्मनिरपेक्ष राज्य होय.' अशी व्याख्या भारतीय समाज विज्ञान कोशाने केली आहे.

**धार्मिक अल्पसंख्यांक**

हिंदू बहुसंख्यांक असलेल्या भारतात मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी, दाऊदी बोहरा, शीख वगैरे अनेक धर्मांच्या अनुयायांचे अल्पसंख्यांक गट आहेत. यांना भारतीय संविधानाने धार्मिक आचार–प्रचारांचे स्वातंत्र्य दिले आहे. इथली राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष असल्यामुळे राज्यव्यवस्थेचा असा कोणताही धर्म नाही. धार्मिक आधारावर व्यक्तीव्यक्तीत भेदभाव न करण्याची हमी राज्यव्यवस्थेने दिली आहे.

हिंदू–मुस्लिम समस्या व धर्मनिरपेक्षता हिंदू–मुस्लिम या दोन्ही जमातींमध्ये धार्मिक तेढ असल्याचे अनेक कारणातून व्यक्त होत असते. म्हणून केवळ धार्मिक कारणांनी त्यांचा संघर्ष होतो हे काही खरे वाटत नाही. दोहोंमध्ये असलेले धर्मपिसाट पुढारी राजकारणासाठी किंवा संकुचित भौतिक लाभांसाठी लोकांच्या धार्मिक श्रद्धांचा वापर करून घेत असतात.

हिंदूंच्यामध्ये साक्षर व उच्च शिक्षणाच्या प्रमाणात मुस्लिमांपेक्षा अधिक संख्या आहे. त्यामुळे मुस्लिमांची सरकारी नोकऱ्या, व्यवसाय, उद्योगधंदे या क्षेत्रांत पीछेहाट झाली. यामुळे त्यांच्या मनात हिंदूविषयी घृणा वाटू लागली. अल्पसंख्यांक भावनेने त्रस्त झाले. स्वातंत्र्योत्तर काळातही अनेक मुस्लिम फाळणीपूर्व मन:स्थितीतून बाहेर पडलेले नाहीत त्यातून हिंदूविरूद्ध 'जेहाद' पुकारण्यास अनेक मुस्लिम संघटना प्रवृत्त करू लागल्या. भारतीय धर्मनिरपेक्षतेला व पुरोगामी कायद्यांना विरोध करू लागले. भारताच्या धर्मनिरपेक्षतेशी जे मुसलमान एकजीव होवू शकलेले नाहीत त्यांच्या मानसिकतेचे कारण मुस्लिमांना भारतात असुरक्षितता जाणवते. आजही काही पुराणमतवादी मुस्लिम संघटनांना भारतात मुस्लिम राजवट येईल असे वाटते. हिंदूपेक्षा मुस्लिम समाजाच्या भौतिक व बौद्धीक वर्गाची मागासलेपणा आढळतो. मुस्लिम समाजात बुद्धीजीवी वर्गाची वाढझाली नाही. हिंदू समाजाच्या तुलनेत आधुनिकीकरणाच्या सर्वच कसोटयांवर मुस्लिम समाज मागे राहिलेला आहे. त्यांच्या धर्मकल्पना मध्ययुगीन राहिल्या असून धर्मनिरपेक्ष नेतृत्व त्यांच्यात विकसित होवू शकले नाही. हिंदू–मुस्लिम प्रश्नाची सोडवणूक करण्याचा एकमेव उपाय भारतीय धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेच्या प्रवाहांशी मुस्लिम समाजाच्या प्रवाहाने एकजीव होणे हाच आहे.

**हिंदू बहुसंख्यांकांची भूमिका**

हिंदू समाज बहुसंख्यांक असल्यामुळे धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भातील त्याची जबाबदारी अधिक मोठी आहे. हिंदू धर्मातील सनातनीपणा इस्लाममधील सनातनीपणाला आधार देत असतो, टिकवून ठेवतो. हिंदूंनी हिंदू धर्मातील सनातनीपणा नष्ट केला पाहिजे. त्यामुळे अप्रत्यक्षपणे मुस्लिमांचा सनातनीपणा नष्ट होईल. हिंदूंनी खऱ्या अर्थाने आधुनिकतेचा स्वीकार केला पाहिजे. त्यामुळे मुसलमानांनाही तो करावा लागेल. हिंदू–मुस्लिम या दोघांच्याही सनातनीपणाला खतपाणी घालण्याचे काम राजकीय पक्षांनी न करता त्यांच्यामध्ये धर्मनिरपेक्षता वाढवण्याचे काम केले पाहिजे. हिंदू–मुस्लिम यांच्यामधील ताणतणाव, दंगली, लुटमार, कत्तली, जीवितवित्ताची अगणिक हानी होते. दोन्ही बाजूंच्या जनसामान्यांचे संसार उध्वस्त होतात. या प्रश्नांचा कायमचा इलाज एक आहे. तो म्हणजे हिंदू–मुस्लिम या दोहोंनी घटनेतील धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारून आधुनिकतेकडे वाटचाल करणे.

**धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता**

धार्मिक अस्मितांमुळे भारतीय राज्यव्यवस्थेपुढे निर्माण झालेली आव्हाने पेलण्याचा एकमेव मार्ग आहे. तो म्हणजे धर्मनिरपेक्षतेचा आचार विचारात प्रामाणिक अवलंब करणे. दैनंदिन सामाजिक–आर्थिक प्रश्नांचा विचार धार्मिक संदर्भातूनच करण्याची जी सवय भारतीयांना जडली आहे ती प्रयत्नपूर्वक सोडून द्यावी लागेल. धर्माच्या आधारे राष्ट्र उभारणी करता येईल अशा भ्रमात कोणीही राहू नये. ऐक्याचे साधन म्हणून जर धर्माचा वापर करायचा तर त्याला आक्रमकतेचे समर्थन व अवलंब वाढत्या प्रमाणावर करणे भाग पडते, म्हणजेच एका धर्माला यात यश मिळविण्यास अन्य धर्मांचा रोष होणे अटळ होते. स्वाभाविकच या प्रक्रियेतून लोकशाही ऐक्य साध्य होण्याऐवजी जमातवादी ताणतणावांनाच खतपाणी मिळते. त्यामुळे भारतासारख्या बहुधार्मिक देशात केवळ धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनच ऐक्याचे अधिष्ठान ठरू शकते. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीला सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य असणे जसे अभिप्रेत असते त्याचप्रमाणे संघटीत व संस्थाबद्ध धर्माने सार्वजनिक जीवनात लूडबूड करण्याचा प्रयत्न हाणून पाडणेही महत्त्वाचे आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. डॉ. भीमसेन रंगाचार्य जोशी, सामाजिक शास्त्रांमधील संज्ञा, सिद्धांताचा स्पष्टीकरणात्मक कोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. प्रथम आवृत्ती, जानेवारी २००७.
२. तुकाराम जाधव/महेश शिरापूरकर, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध, खंड १, द युनिक ॲकॅडमी, पुणे. प्रथम आवृत्ती, २०११.
३. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी, नागपूर, जून २००३.